# प्रकरण चौथे
# " यशवंतराव चव्हाणांच्या भाषणांचा वाङ्मयीन अभ्यास "

(अभिव्यक्ती व आशय सौंदर्याच्या अंगाने)

पृष्ठ क्रमांक १३० ते १६१

# प्रकरण चौथे
## - यशवंतराव चव्हाणांच्या भाषणांचा वाङ्मयीन अभ्यास -
## (अभिव्यक्ती व आशय सौंदर्याच्या अंगाने)

'सभा जिंकणारा वक्ता' म्हणून ओळखले जाणारे यशवंतराव आपल्या व्याख्यानांतून लाखो जनसमुदायाला मंत्रमुग्ध करीत असत. सखोल वाचन, मनन आणि चिंतन याला अनुभवाची जोड देऊन ते भाषणांतून श्रोतृवर्गाच्या हृदयसिंहासनावर आरूढ झाले होते. प्रतिभावंत आणि प्रभावशाली वक्तृत्वातून, सभा-संमेलनातून, कृती-उक्तीतून यशवंतरावांचे व्यक्तिमत्व आपल्यासमोर आजही उभे राहते. छ. शिवरायांची अस्मिता मराठीतून जर कोणी अवगत करून लोकशाहीमध्ये सामान्यातील सामान्याला प्रबोधित केले असेल तर ते यशवंतरावांनीच! अमोघ वक्तृत्वातून नेतृत्व आणि नेतृत्वातून कर्तृत्व करीत असताना त्यांच्या शब्दाशब्दांमध्ये वाङ्मयीन सौंदर्य असल्याचे आपल्या प्रत्ययास येते.

यशवंतरावांच्या वाक्यावाक्यातून एक-एक विचार अनुभवयास मिळतो. 'विचार प्रकटीकरण' हा यशवंतरावांच्या भाषणाचा गाभा आहे. या विचाराला सौंदर्याची जोड देवून साहित्याच्या क्षेत्रात मोलाची भर घातली ती त्यांच्या भाषणसंग्रहांनी. 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर' आणि 'भूमिका' या भाषणसंग्रहातील एक एक लेख म्हणजे जणू एक - एक ललित निबंध होय. केवळ शब्दांची जुळवाजुळव न करता त्याला वाङ्मयीन सौंदर्याची अर्थपूर्ण प्रवाही भाषाशैलीचे रूप लाभलेले आहे. खाजगी भाषण, जाहीर भाषण, विषयानुरूप व्याख्यान अशा भाषणांनी त्यांचे वक्तृत्वआविष्कृत होते. अनेक सभा, शैक्षणिक कार्यक्रम, साहित्य संमेलन, वैचारिक व्यासपीठे, सामाजिक, आर्थिक, राजकीय कार्यक्रम, विधानसभा, लोकसभा, युनो इ. ठिकाणी त्यांनी भाषणे दिली. प्रत्येक भाषणातून वेगवेगळ्या शैलीचा वापर त्यांनी केलेला दिसून येतो. यशवंतरावांची भाषणे भरपूर आहेत. त्यामुळे काही निवडक पुस्तकातील निवडक भाषणेच वाङ्मयीन चिकित्सेसाठी घेतली आहेत.

१) सभा जिंकणारा वक्ता :-

मराठी भाषेचे शिवाजी म्हणून चिपळूणकर स्वत:लाच I am the Shivaji of Marathi Language असे म्हणत असत, पण त्यांची वाक्ये प्रदीर्घ व लांबलचक असत. वक्तृत्वामधला गनिमी कावा हा कदाचित चिपळूणकरांना उमगला नसावा. त्यामुळे त्यांची पल्लेदार भाषा सामान्याप्रत पोहोचत नसे. यशवंतरावांनी मात्र आपल्या प्रभावी वक्तृत्वातून लाखोंच्या जनसमुदायाला मंत्रमुग्ध केले आणि ते सभा जिंकणारे वक्ते ठरले.

यशवंतरावांना बालपणापासूनच भाषणाचा छंद जडला होता. शालेय जीवनात असताना त्यांनी १९३१ साली पुण्याच्या नुतन विद्यालयामध्ये 'ग्रामसुधारणा' या विषयावर भाषण केले. यशवंतरावांचे भाषण ऐकून परिक्षक खूष झाले त्यांनी १० मिनिटे वेळ वाढवून दिला. सर्वांनी खूप कौतुक केले आणि त्यांना पारितोषिक मिळाले. यावरून लक्षात येते की, यशवंतरावांच्यात वक्तृत्व हा गुण बालपणापासूनच होता. ते आपल्या विचारांचे प्रकटीकरण अतिशय शांत व लयबध्द रितीने करत असत. साधी-सोपी आणि सरळ भाषा, लोकांना समजेल, उमजेल अशी उदाहरणे ते आपल्या भाषणांतून देत असत.या भाषणांना वैचारिक प्रगल्भतेची बैठक असे. मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीनही भाषा त्यांना अवगत होत्या. त्यातून ते आपले विचार व्यक्त करत असताना जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न मांडत. त्यांच्या भाषणांमध्ये व्यापकता आणि सर्वसमावेशकता असे. प्रवाही भाषेतून एक-एक विचाराचा कप्पा ते उलगडत असत आणि आपले मत ते जनतेसमोर जनतेच्याच बोली भाषेत मांडत असत.

श्रोतृवर्ग ज्या धाटणीचा असेल त्याच धाटणीतून आपला विषय यशवंतराव मांडत असत. त्यामुळे श्रोतृवर्ग अतिशय एकाग्रतेने त्यांच्या भाषणात एकरूप होऊन जात असे. दुसऱ्याचे दु:ख जेव्हा आपले वाटते तेव्हाच ते अधिक जाणवते. या जाणीवेतून ते जनतेचे प्रश्न, समस्या सोडविण्याचा प्रयत्न करीत असत. आपल्या भाषणातून समाजाला ते स्फुर्ती-प्रेरणा देत असत. त्यांच्या भाषणात द्वेष, मत्सर, चिड, राग असा सूर कधीच नसे. अतिशय प्रसन्न अशा मितभाषी, मोजक्याच शब्दातून ते आपले विचार मांडत असत. त्यामुळे श्रोतृवर्गाला ते मंत्रमुग्ध करीत असत.

२) यशवंतरावांच्या भाषणांतील लालित्याची डूब :-

कोणताही विषय मांडत असताना यशवंतराव त्याला लालित्याची डूब देऊन श्रोत्यांसमोर उभा करत असत. त्यामध्ये सुभाषितवजा सुंदर व काव्यपंक्तीचा भरमार

असे. त्यामध्ये सुभाषितवजा सुंदर वाक्यांची ते पेरण करीत. विविध चर्चासत्रात, परिसंवादात, वादविवादात प्रभावीपणे बोलताना त्यांचे भाषाज्ञान सतर्क असे. विषय रंगवित असताना त्यामध्ये प्रतिकात्मक शब्दांचा ते वापर करत. महाराष्ट्राच्या कोरडवाहू शेतीविषयी ते 'सह्याद्रीचे वारे' या पुस्तकांतील 'नियोजन मनुष्यबळ व शेती' या लेखात म्हणतात- ''मथुरेची गवळण पाणी भरून डोक्यावर हंडा घेऊन निघाली आणि येऊन पहाते की आपल्या डोक्यावरच्या हंड्यात पाणी नाही. तसे आपल्या शेतीचे झाले आहे. दरवर्षी मृगनक्षत्रापासून हस्त नक्षत्रापर्यंत भरलेल्या नक्षत्रांच्या बाजारामध्ये आपल्या डोक्यावर भांडे घेऊन आपण जातो. पण त्यात शेवटी काहीच शिल्लक रहात नाही. आमच्या महाराष्ट्राच्या शेतीचा हा मथुरेचा बाजार झाला आहे.''[1] त्यांच्या शब्दांतील सौंदर्याचा साज शिणगार श्रोत्याला एका वेगळ्या वाङ्मय विश्वात नेऊन आस्वाद देतो.

यशवंतराव आपल्या भाषणांमध्ये अधे-मधे सुभाषितही वापरतात, ''काव्य शास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम''[2] असे एक सुंदर सुभाषित आहे. 'काव्य, शास्त्र, विनोद यांच्या सहवासाने काळसुध्दा हळुवारपणे व्यतीत होतो'. असा त्याचा अर्थ आहे. यशवंतरावांना याची आवड होती. ते सतत मांगल्याच्या दिव्यता व भव्यतेच्या शोधात असायचे. 'कलेसाठी कला' यापेक्षा 'कलेसाठी जीवन आणि 'जीवनासाठी कला' या विचाराचे यशवंतराव होते.

अतिशय संयमी, संस्कारित, प्रसंगोचित भाषाशैली वापरून लोकांना ते आकर्षित करीत असत. त्यांच्या भाषणात, आशयात अभिजात, साहित्यिक, रसिक आणि लाघवी दृष्टी असे. त्यांची भाषणे अतिशय प्रभावी असत. आपल्या भाषासिध्दीवर, विषयप्रभुत्वावर व वाक्सामर्थ्यावर यशवंतरावांचा प्रचंड विश्वास होता. ''अवघेची जीवन सेवामय होवो. आस असो रयतेच्या स्वप्नांची''[3] त्यांची भाषाफेक श्रोत्यांच्या मनाची पकड घेत असे. वाङ्मयीन सौंदर्याचा आस्वाद त्यांच्या या भाषणातून रसिकाला येतो.

लालित्यपूर्ण आस्वाद ते श्रोत्यांना आपल्या भाषणातून देतात. वर्तमान, वास्तव, सामाजिकता आणि मानवता यांचे भानही या भाषणातून जाणवते. अतिशय सुसंस्कारित कलाकृतीतून वाचकांना लालित्याचा आस्वाद मिळतो.

३) ललित निबंधाचा दर्जा :-

यशवंतरावांच्या भाषणांनी ललित निबंधाचा दर्जा प्राप्त केलेला आहे. ललित निबंध हा वाङ्मयाचा एक प्रकार आहे. यशवंतरावांना भाषणातून एखादा विचार मांडावयाचा असेल तर त्याचे मुद्देसुद मांडणीतून ते अविष्कारण करतात. कोणत्याही प्रश्नाची पार्श्वभूमी, त्याचे स्वरूप, त्यावर चिंतन मनन, वास्तववादी भूमिका आणि उपाययोजना यातून ते श्रोतृवर्गाच्या हृदयाला भिडणारी भाषा भविष्यकालीन घटनांचा वेध घेतात. ग्रामीण समाज, ग्रामीण व्यक्ती त्यांची जीवनपध्दती, रूढी-परंपरा, अनेक थोर व्यक्ती या सर्वांचा संस्कार त्यांच्या ललित भाषणांवर पडत असतो.

यशवंतरावांचा जीवन विषयक दृष्टीकोन अतिशय दूरदृष्टीचा वेध घेणारा होता. स्वातंत्र्योत्तर काळातील घटनांचा आपल्या साहित्यातून उहापोह करताना त्यांच्यातील जीवनदृष्टी, चिंतनशीलता आणि वैचारिकतेचे अधिष्ठान लक्षात येते. कोणत्याही विषयासंबंधी स्पष्टीकरणात्मक, विवरणात्मक लेखन ते करतात. निबंध वाङ्मयप्रकार असला तरी यशवंतरावांनी अतिशय चपखलपणा त्यामध्ये आणलेला आहे. आविष्कारापेक्षा त्यांनी विचाराला अधिक महत्व दिलेले आहे.वक्तृत्वशैलीचे गुण त्यांनी निबंधशैलीत घेतलेले दिसून येतात.यामध्ये प्रथमत: विषयाला समर्पक आरंभ, प्रस्तावना करणे, विषयाचा गाभा सांगत असताना त्याची व्याप्ती सांगणे, त्याचे वेगवेगळे विभाग पाडून त्यासाठी उदाहरणे देऊन त्यांची मुद्देसुद मांडणी करणे, त्यामध्ये प्राचीन काळातील घटना, प्रसंग सांगून शेवटी अनुमान काढणे, ही पध्दत यशवंतरावांच्या ललित निबंधाची असल्याचे दिसून येते. तर्कशुद्ध, मुद्देसुद व सुस्पष्ट मांडणीला प्राधान्य देऊन त्यांनी ललित निबंध सजविला आहे.

यशवंतरावांच्या निबंधाचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते आपले मत समोरच्याला सांगत आहेत, आपले विचार समोरच्या व्यक्तीला पटवून देत आहेत असे जाणवते.ते श्रोत्यांना आपले विचार सांगत असतात. समाजालाही सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत. मानवी जीवन अतिशय जिव्हाळ्याने, विचारपूर्वक, चिंतन, मनन करून ते त्याविषयी विवरण करतात. अंत:करणाला भिडणारी भाषा ते वापरतात त्यामुळे त्यांची भाषणे लोकशिक्षणाचे माध्यम वाटतात. मराठी माणसाच्या उत्कर्षाचे विचार ते मांडतात.त्यांच्या प्रत्येक भाषणाला निबंधाचा दर्जा यामुळेच प्राप्त झालेला दिसून येतो.

ललित निबंध या वाङ्मयप्रकारात 'मी'च्या अनुभवांचे चित्रण केलेले असते. यशवंतरावांनी स्वत:ला आलेल्या अनुभवांचे चित्रण या भाषणांतून, निबंधातून केलेले

आहे. प्रवासवर्णनपर लेख, व्यक्तिचित्रे, ललित लेख, आठवणी, अनुभव, लघुनिबंध इ.चा विचार या निबंधप्रकारात यशवंतरावांनी केला आहे. ललित निबंधाची वैशिष्टये असलेल्या यशवंतरावांच्या भाषणांना एक साहित्यिक व वाङ्मयीन दर्जा प्राप्त झाला आहे.

४) विचार प्रकटीकरण हाच भाषणाचा गाभा :-

यशवंतरावांच्या भाषणाचा-निबंधाचा 'विचारप्रकटीकरण' हा महत्वाचा हेतू असल्याचे लक्षात येते. विषय कोणताही असो त्यातून एक तरी नवीन विचार ते सांगतात असे जाणवते. महाराष्ट्राला वैचारिक विचाराचे पाथेय देणारा यशवंतरावांसारखा महापुरूष सुदैवाने लाभलेला होता. विचार करणारा व विचार बोलून दाखविणारा प्राणी ही माणसाची व्याख्या, त्याचे विचार इतर प्राण्याहून वेगळेपण सिद्ध करते. मानवी जीवन विकसित करण्यासाठी समाज गतिमान करण्याची क्षमता विचारात आहे म्हणूनच नव्या विचाराचे स्वागत झाले पाहिजे. विचारातूनच नवीन विचार जन्माला येतात.''अभिप्राओ अभिप्रायते वियेे। भावांचा फुल्लोरा होतू जाये॥ मतिवरी.''[४] कलह झाला पाहिजे तो विचारांचा. विचारांचे धन घेऊन समाजाचे मन समृध्द करण्याची आवश्यकता यशवंतरावांनी ओळखली होती.

यशवंतरावांचे विचारनिष्ठ गद्यलेखन गंभीर प्रकृतीचे असले तरी त्याच्यातही लालित्य आहे. तार्कीक सुसंगती, खंडनमंडनाची उर्मी, शैली, अलंकारिकता, लेखकाचे प्रकट होणारे व्यक्तिमत्व यामुळे त्यांच्या वैचारिक लेखनालाही स्वत:चे असे वेगळे वैशिष्टय लाभले आहे हे त्यांच्या समग्र भाषणांतून जाणवते. ''यशवंतराव चव्हाण ही एक व्यक्ती नसून तो एक विचार आहे''[५] हे त्यांच्या समग्र भाषणातून प्रत्ययास येते. त्यांच्या भाषणामध्ये निव्वळ अलंकारिक भाषा नसते, तर महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेला विकसित करण्याचे कार्य आपल्यासमोर उभी करते. स्वत:च्या विचारावर जिवापाड प्रेम करणाऱ्या विचारवंतांची जीवनचरित्रे नेहमीच प्रेरक व मार्गदर्शक ठरतात. अखिल विश्वाविरूध्दही झगडण्याची क्षमता असलेल्या या विचारवंतांच्या विचारवैभवाने आपण दिग्मूढ होतो. विवेकनिष्ठेचा आग्रह धरणारांची आपल्या देशातील परंपरा ज्या थोड्या लोकांनी जतन केली आहे.त्यात यशवंतरावजी अग्रणी आहेत.

यशवंतरावांनी प्रत्येक भाषणांतून वैचारिकता जोपासल्याचे दिसून येते. "वैचारिकतेची डूब हा यशवंतरावांच्या नेतृत्वाचा असा एक लोभस पैलू होता."[६] विचाराच्या वेगवेगळ्या छटा त्यांच्या भाषणांतून दिसून येतात.समाजवाद, साम्यवाद, मार्क्सवाद, गांधीवाद वगैरे विचारसारणीतील बारकावे त्यांच्या लक्षात आल्याने त्यांचे एक 'वैचारिक व्यक्तिमत्व' तयार झाले. चिंतनप्रधान प्रबंधापासून काव्य-कथा-कादंबऱ्यांपर्यंत चौफेर वाचन असल्यामुळे त्यांच्या भाषणांमध्ये समर्पक काव्याची उदाहरणे ते नेहमीच देतात. समाजातील कोणत्याही घटकांकडे ते अतिशय साक्षेपी दृष्टीने पाहतात. मराठी माणसाच्या मनातील इच्छा-अकांक्षा त्यांनी विचारपूर्वक पूर्णवत करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या नेतृत्वाचा प्रादेशिक पाया किंवा मराठी माणसाच्या मनात काही ऐतिहासिक कारणांनी फळी पेरून ठेवलेली आत्मकेंद्रियता यांच्या मर्यादा ते आपल्या वैचारिक प्रगल्भतेतूनच ओलांडू शकले.मराठी अस्मिता आणि राष्ट्रनिष्ठा यांत त्यांना कधीच अंतर्विग्रह जाणवला नाही. लोकशाहीत माणसा-माणसांतील परस्पर संबंधाला अनन्यसाधारण महत्व असते. तो एक जगन्नाथाचा रथ असतो. लोकशाहीत आज्ञा नसते तर संवाद-संभाषण असते. नव्हे तेच तिच्या जिवंतपणाचे लक्षण असते, तीत नाना विचारांची, नाना मतांची देवाणघेवाण असते. हाच उदात्त हेतू त्यांच्या विचारांमागे असल्याचे जाणवते.प्रादेशिक, भाषिक, धार्मिक, जातिय, शैक्षणिक प्रश्नांची यशवंतरावांनी केलेली यथोचित मांडणी लक्षणीय ठरणारी आहे.प्रश्न कोणताही असो, त्यातल्या मूलभूत मुद्दयांचे त्यांना चट्कन आकलन होत असे आणि त्यांच्या आधाराने स्वतंत्रपणे निर्णय घेणे त्यांना शक्य होत असे. त्यांच्या व्यक्तिमत्वाची ठेवणच वैचारिक असल्यामुळे ते अतिशय मुद्देसुद, मर्मग्राही आणि प्रसंगोचित बोलत असल्याचे त्यांच्या भाषणांतून जाणवते.

### ४) अभ्यासपूर्ण व्यासंगी भाषणे :-

यशवंतरावांचे वक्तृत्व हा त्यांच्या वाङ्मयीन आणि सांस्कृतिक जीवनातला एक चैतन्यशील व समृध्द असा महत्वाचा भाग होता.विविध विषयांना स्पर्श करणारी आपली नेमकी व ठाम मते त्यांनी मांडली. यशवंतरावांच्या भाषणांनी वैचारिक व ललित निबंधाचा दर्जा प्राप्त केला आहे. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वाची ठेवणच वैचारिक आणि व्यासंगी अशी असल्यामुळे ते कोणत्याही विषयावर जे बोलत, ते अत्यंत मर्मग्राही, मुद्देसुद आणि व्यासंगी असायचे. अतिशय अभ्यासपूर्ण, चिंतन मनन करून यशवंतराव

आपले मत मांडत, आवाजात चढउतार आणून आपले म्हणणे श्रोत्यांना समजेल असे मांडणे, योग्य तेथेच विराम घेणे, युक्तिवाद करता येणे, श्रोत्यांच्या मनास स्पर्श करणाऱ्या भाषेत विचार-भावनांची मांडणी करणे. श्रोत्यांना आपले म्हणणे समजेल असे सोप्या व परिणामकारक शब्दात मांडणे, लोकशाही व्यवस्थेत प्रभावी बोलणे ही यशवंतरावांच्या वक्तृत्वाची पध्दत होती. विचार म्हणजे वाचनाने, अध्ययनाने, व्यासंगाने मेंदूत साठविलेले विचार, असे बहुतांशी मानतात. विचाराची सोबत केली, मेंदुत साठविण्याचा प्रयत्न केला हे सत्य नसले तरी मला जी फलवृत्ती होऊ शकली ती केवळ विचाराची अहर्निश सोबत ठेवल्यामुळेच प्रामुख्याने मिळाली. असे मी मानत नाही.तसे पाहिले तर वाचनाने, अध्ययनाने, व्यासंगाने विचारवंत बनलेले पुष्कळ असू शकतात.

व्यासंगी वक्तृत्व असणाऱ्या यशवंतरावांच्या भाषणामध्ये श्रोत्यांची मने भारून टाकणारे चैतन्य, त्यांना स्फुरण चढवणारी प्रसन्नता असे. डॉ. हे.वि. इनामदार यशवंतरावांच्या व्यासंगाबाबत म्हणतात - ''नामदार स्वर्गीय यशवंत बळवंत चव्हाण हे राजकारण धुरंधर नेते म्हणून ओळखले जातात, पण त्याबरोबर ते व्यासंगी लेखक व रससिध्द वक्तेही होते.'अभ्यासाने प्रगट व्हावे' हे समर्थ रामदासांचे वचन यशवंतरावांच्या बाबतीत सर्वस्वी सार्थ होते.''[७] वक्तृत्व आणि कर्तृत्व यांचा मेळ घालणारे यशवंतराव बोलताना नेहमी मृदू भाषेत बोलत. मित्र असो वा विरोधक असो त्यांच्याशी ते कधीही फटकून वागत असत. मोठ्या, सन्माननीय व्यक्तींबद्दल आदर बाळगत असतानाच लहानांनासुध्दा त्यांनी सन्मानाने वागविले आहे. माणसांना ओळखून साऱ्या जाती-जमातींना एकत्र घेऊन ते काम करत. जातीभेदाविषयी बोलताना यशवंतराव म्हणतात - ''सावता माळी फक्त माळ्यांचा संत आहे, नामदेव फक्त शिंप्यांचा संत आहे. चोखा मेळा फक्त महारांचा संत आहे, गोरा कुंभार फक्त कुंभारांचा संत आहे अशीच वाटणी का आम्ही नेहमी करणार आहोत? शिंपी समाजाला नाव देताना नामदेव शिंपी समाज असे म्हणतात. नामदेवाचे एवढे मोठे विश्वव्यापी काम! परंतु आज आम्ही काय त्यांना केवळ एका शिंपी समाजाचे प्रतीक मानणार?''[८] अशा वास्तववादी वक्तव्यातून स्पष्टता व जिवंतपणा ते आणतात.

वैचारिक दृष्ट्या अभ्यासनीय असणारे यशवंतराव अनेक कार्यक्रमाच्या प्रसंगी आपले विचार मांडताना अतिशय संथ, लयबध्द सोप्या भाषेत आणि संयमाने बोलत. विवेकपूर्ण असणाऱ्या त्यांच्या भाषणात बहुश्रुतता असे. राजकीय प्रसंगात भाषणे करीत असताना ते काही टिपणे काढत असत. विधिमंडळात बोलताना अतिशय नैपुण्य

बाळगत. पूर्वतयारी पुरेशी नसणे, उडवाउडवीची उत्तरे देऊन वेळ मारून नेणे, विरोधकांचा अकारण अधिक्षेप करणे वा अरेरावी करणे असे प्रकार त्यांच्या संसदीय कारकीर्दीत त्यांच्या हातून सहसा घडले नाहीत. ते एक मातब्बर संसदपटु असल्याची साक्ष त्यांच्या अनेक समकालीनांनी दिली आहे. या संदर्भात लेखक भा.ल. भोळे म्हणतात - ''त्यांच्या व्यासंगामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्वात, इतर चंचल व शब्दशूर नेत्यांच्या तुलनेने घनगंभीर संयम आणि लोभस अबोलपणाही प्रादुर्भूत झाला असावा.''[9] त्यांचे व्यक्तिमत्व व राजकीय चारित्र्य अतिशय स्वच्छ राहिले.

'स्टेटसमन'च्या संपादकाने म्हटल्यानुसार, 'त्यांच्या भाषणात खोचक वाक्याच्या फैरी नसल्या तरीही ती प्रभावी होत.कारण त्यातून त्यांचे प्रसंगावधान, वैचारिक समतोलपणा, क्लिष्ट समस्यांची उकल करण्यासाठी लागणारा चिवटपणा त्यांच्या विधानांचा समयोचितपणा व संयमपणा श्रोत्यांच्या प्रत्ययास येत असे.''[10] असे त्यांचे वक्तव्य अभ्यासपूर्ण व वस्तुनिष्ठ तर असायचेच, शिवाय जनहितैकबुध्दी त्यांच्या मुळाशी असल्याची साक्ष भाषणे ऐकणाऱ्याला ताबडतोब मिळते. ते गरिबी विषयी म्हणतात,''तिन्ही सांजेच्यावेळी मुले अन्नासाठी कासावीस झाली आणि घरात कणही नसला म्हणजे आईच्या पोटात जी कळ येते ती गरिबी! भुकेची कळ ज्यांना माहित नाही त्यांना गरिबी कळणार नाही.''[11] असा जिवंतपणा त्यांच्या भाषणांतून असल्यामुळे श्रोते एकाग्रतेने प्रचंड संख्येने यशवंतरावांची भाषणे ऐकत.सहजता हा यशवंतरावांच्या भाषणाचा विशेष होता. ते एके ठिकाणी म्हणतात - ''आपण माझी शिवाजी महाराजांबरोबर तुलना करता पण हे सर्व खोटे आहे. या खोट्या तुलनेने आपण फसू नका आणि कृपा करून मलाही फसवू नका. शिवाजी महाराज एकच होऊन गेले.त्यांनी महाराष्ट्राचा इतिहास घडविला. आता ते पुन्हा होणे नाही. त्या महान विभुती आहेत. आपण राग, लोभ असणारी छोटी माणसे आहोत.''[12] असा पट्टीचा वक्ता, रसिक जनांचा भोक्ता, समतोल असणारा विचारवंत, व्यवहारी प्रज्ञावंत व्यक्तिमत्व यशवंतरावांचे होते.

कराडच्या साहित्य संमेलनात श्रीमती दुर्गा भागवत या आणीबाणीच्या विरोधक साहित्य संमलेनाच्या अध्यक्षा होत्या. वातावरण स्फोटक होते. यशवंतरावांसाठी आसन निश्चित केले होते. पण यशवंतराव मोठ्या मनाचे होते. ते दुर्गाबाईंना, पु.ल. देशपांडेंना नमस्कार करत ''मी राजकारणी म्हणून येथे आलेलो नाही तर तुमच्या साहित्याचा चाहता रसिक आणि मराठी वाङ्मयावर नितांत प्रेम करणारा आस्वादक म्हणून आलो आहे.माझी जागा आज समुदायात आहे.''[13] असे ध्वनिक्षेपकावरून सांगितले आणि

अथांग असा जनसागर त्यांच्या वक्तव्याने प्रभावित झाला. त्यांचे वक्तृत्व आकर्षक आणि मंत्रमुग्ध करणारे असे. नर्मविनोद करीत श्रोत्यांना विश्वासात घेत, मृदूवाणीत त्यांचे भाषण रंगत जात असे. श्रोत्यांच्या अंत:करणापर्यंत जाऊन पोहोचणारी, समाजमनाची नस पकडणारी वाणी त्यांच्या वक्तव्यात असे.

यशवंतरावांच्या वक्तृत्वाबाबत विठ्ठलराव पाटील म्हणतात, ''यशवंतरावांच्या वक्तृतवास राजकीय कर्तृत्वाचा, यशस्वी तत्वगुणांचा, प्रशासकीय कौशल्याचा अभ्यासपूर्ण विचारांचा आणि अविचल निष्ठांचा जसा भाग होता तसाच त्यांच्या संयमी, सुसंस्कारीत, प्रसंगोचित आणि लालित्यपूर्ण अविष्कार-निपुणतेचाही फार मोठा भाग होता.लोकांना आकर्षित करील अशी वक्तृत्वशैली पण त्याचबरोबर त्यांच्या भाषणातील आशयात अभिजात साहित्यिक, रसिक आणि लाघवी दृष्टी विलोभनीय असे.''[१४] यशवंतरावांचे भाषण पडलेले जसे कोणी ऐकलेले नाही त्याचप्रमाणे त्यांचा फसलेला लेखही कधी आढळत नाही. त्यांची सर्वच भाषणे म्हणजे 'निर्मळ वक्तृत्वाचा ठेवा' असे म्हणता येईल.

मुंबईहून प्रसिध्द होणाऱ्या दै. 'महाराष्ट्र टाईम्स' चे माजी संपादक द्वा.भ. कर्णिक म्हणतात, - ''यशवंतराव चव्हाण यांचा व्यासंग चांगला आणि बोलण्यात वाक्‌बगार आहेत पण त्यांनी मितभाषित्व हा आपला बाणा केला आहे. जे काही ते बोलतात ते मोजके व मुद्‌देसुद असते. राजकीय जीवनात लोकांना कृतिशून्य पण शब्दसूर लोकांच्या तोंडाचा पट्टा चाललेला ऐकण्याची सवय झाल्यामुळे या अबोल व मितभाषी अशा ना.यशवंतरावांची त्यांच्यावर साहजिकच अधिक मोहिनी पडते.''[१५]

अतिशय विनम्र, मितभाषी, नर्म विनोदपूर्ण वक्तृत्व, लोभस अबोलपणा, शांत, धीरगंभीरपणे यशवंतराव भाषण करत त्यातून वाङ्मयीन सौंदर्याची उधळण ते करत असत म्हणूनच वक्तृत्वाला अभ्यासाची जोड असेल, व्यासंग असेल त्यालाच चिंतन, मनन असेल तर ते निश्चितच अतिशय प्रभावी ठरते हे यशवंतरावांच्या प्रभावी वक्तृत्वातून दिसून येते.

## ६) आशय सौंदर्य :-

यशवंतरावांच्या भाषणांतील आशय सौंदर्य रसिक मनाला मोहिनी घालणारे अन् वास्तववादी स्वरूपाचे आहे. कोणताही विषय असो त्या विषयाचा व्यासंग असल्यामुळे ते अतिशय मार्मिकतेने तो विषय टप्प्याटप्प्याने मांडतात. लोकाभिमुख दृष्टीचा हा नेता

कोणत्याही विषयात 'माणूस' हाच महत्वाचा केंद्रबिंदू मानतो. बहुविध पैलू असलेले यशवंतराव सत्तेच्या माध्यमातून जनसेवेचे व्रत आंगिकारतात हे त्यांच्या भाषणातून दिसून येते.

यशवंतरावांच्या भाषणांचा आस्वाद घेताना एक गोष्ट जाणवते ती म्हणजे त्यांची 'सामाजिक तळमळ' होय. समाज, समाजातील प्रश्न, समस्या त्यावरती उपाययोजना त्याचबरोबर या सर्वांतून मानवाचे कल्याण साधणे हा महत्वाचा गाभा यशवंतरावांच्या भाषणामंध्ये दिसून येतो.साहित्याचे ध्येयच मुळी मानवी जीवनाचे कल्याण करणे आहे असे ते मानतात.'' साहित्याची अंतिम प्रेरणा मानवी मूल्यांची जाणीव करून देणारी असली पीहजे असे मी मानतो.''[१६] म्हणणारे यशवंतराव देशाच्या हितासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे असे सांगताना म्हणतात - ''देशातील विचारवंत, कलावंत, लेखक, शास्त्रज्ञ व संशोधक यांच्या प्रयत्नाने निर्माण होणारे विचारधन हेच समाजाचे फार मोठे धन आहे असे मी आणि महाराष्ट्र शासन मानते. ते असले तरच देश ओळखला जातो, समाज ओळखला जातो. समाजाचे जीवन प्रवाही राहते, चिरंतन राहते. समाज जिवंत राहतो तो त्याच्याजवळ असलेल्या भौतिक सामर्थ्याने नव्हे तर त्याच्याजवळ असलेल्या सांस्कृतिक मूल्यावर आणि विचारधनावर तो जिवंत राहतो आणि वाढतो.''[१७] असे अर्थपूर्ण विश्लेषण यशवंतराव करतात.यातूनच त्यांच्या भाषणातील आशयघनता लक्षात येते. कमी शब्दातून भरपूर आशय कसा व्यक्त होईल याकडे त्यांचे अधिक लक्ष असे.त्यांनी शब्दांचे सामर्थ्य, शब्दाचे सौंदर्य, शब्दाचे लालित्य ओळखले होते त्यामुळे अभिव्यक्तीपेक्षा शब्दांच्या आशयावर त्यांचे स्वाभाविकच जास्त लक्ष दिसते.

यशवंतरावांच्या विचाराची खोली अधिक असल्यामुळे ते आपल्या भाषणांतून विविध विषयांवर अतिशय सखोल विचार मांडतात. कोणत्याही विषयांवर बोलताना त्यातील अधिकाधिक सर्वांगाने ते चर्चा करतात. उदा. शिक्षणाविषयी विद्यार्थ्यांना ते म्हणतात - ''असत्यापासून सत्याकडे, अंधारातून प्रकाशाकडे, मृत्यूपासून अमृताकडे 'मला' ने या अमृततत्वाच्या प्राप्तीसाठी देवांनी समुद्रमंथन केले पण त्या समुद्रमंथनातून जे अमृत निघाले ते देव प्राशन करून बसले. आता आमच्यासाठी अमृत शिल्लकच राहिलेले नाही; म्हणून शिवाजी विद्यापीठाने घोषणा केली आहे की, ''ज्ञानमेवामृतम्'' आता ज्ञान हेच अमृत आहे. या अमृताने तुम्हाला समर्थ बनावयाचे आहे. समाजजीवन समर्थ बनवावयाचे आहे.''[१८] आशयातून सौंदर्य निर्माण करण्याची कला यातून आपल्या

प्रत्ययास येते. यशवंतरावांचा साध्या अन् सोप्या भाषेतील आशय हा अर्थपूर्ण मांडण्याचा हातखंडा सर्व भाषणांच्या वाचनातून जाणवतो.

साहित्याचा आस्वाद घेणे ही त्यांची प्राथमिक भूमिका असल्याचे यशवंतराव सांगतात. निसर्गात रमणे, मन:पूर्वक एखादा अनुभव घेणे, भूतकाळातल्या कडूगोड आठवणींची प्रसंगोपात उजळणी करणे, लोकजीवनाच्या संजीवक संपर्काला प्रयत्नपूर्वक जोपासणे, बुध्दीइतकेच भावनेलाही महत्व देणे ही सारी त्यांच्यातल्या प्रतिभावंत कलावंताची लक्षणे दिसून येतात. अतिशय बारीकसारीक निरीक्षणे असल्याचे त्यांच्या भाषणांतून जाणवते.

"प्रत्येक माणसाच्या पाच मुलभूत गरजा असतात. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या त्या गरजा होत. सध्या आपण आरोग्यसेवांच्या विस्तारावर बराच पैसा खर्च करीत असतो.परंतु सर्वसामान्य माणूस अजुनही प्राथमिक आरोग्यसेवेपासून दूरच राहिलेला आहे."[15] समाजातील दलित, गरिब, उपेक्षित, दुर्लक्षित, आदिवासी, वनवासी यांच्या प्रश्नाकडे ते आपल्या भाषणातून लक्ष वेधतात.लोकजीवन समृध्द करण्याचा त्यांचा मानस होता. लोकांच्या संस्कृतीची अभिवृध्दी व्हावी असे त्यांना वाटते. मानवी मूल्यांचा प्रत्यय ही वाङ्‌मयाची कसोटी असावी व त्यातून मानवी गुणांची वाढ व्हावी हाच त्यांच्या आशयाचा महत्वाचा गाभा आहे.

यशवंतरावांनी आपल्या भाषणांतून सर्व विषयांवर दृष्टीक्षेप टाकून मानवी जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. शिक्षण, सहकार, आर्थिकता, सामाजिकता, साहित्य, संस्कृती, शेती, आरोग्य अशा महत्त्वपूर्ण बाबीतून समाजजीवन प्रगतीपथावर नेण्याचा त्यांचा मानस वेगवेगळ्या विषयावरील विचारांवरून दिसून येतो. आशयातील विविधता, सखोलता, सूक्ष्म संवेदनशक्ती, तरलभावना, योजकता, वास्तवता यशवंतरावांच्या भाषण विषयांची वैशिष्ट्ये सांगता येतील. विषयाची मांडणी विषयाला अनुसरून उदाहरणे देणे, विषयाची समर्पकता, विषयानुरूप आशय, आशयाला सौंदर्याची जोड देणे असे महत्त्वपूर्ण भाषणाचे रूप-रंग दिसून येतात.

## ७) नाट्यमयता :-

यशवंतरावांच्या भाषणांमध्ये नाट्यमयता हा एक वेगळा विशेष आहे. श्रोतृवर्ग पाहून आपल्या भाषणाची पध्दत ते ठरवित असत. 'मला सत्तेचा मोह नाही, विचारांचा मोह जरूर आहे' असे म्हणणारे यशवंतराव भाषणामध्ये अनेक उदाहरणे नाट्यमय

पध्दतीची देत असतात. मुंबई शहरातील एका सत्कारसमारंभ प्रसंगी ते म्हणतात - ''माझ्यावरील प्रेमामुळे आताच काही व्यक्तींनी माझी युगपुरूषाबरोबर तुलना केली. त्यांच्या भावना मी समजू शकतो परंतु मी त्या नेत्याएवढा मोठा नाही हे न समजण्याइतका लहानही नाही.''[२०] अशा शब्दचमत्कृतीतून नाट्यमयता ते आणतात.

यशवंतराव भाषणांमध्ये मिष्किलपणे कोणत्याही गंभीर विषयावर विश्लेषण करीत असत.त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेकविध पैलू त्यांच्या भाषणांतून दिसून येत असतात. एक गोष्ट जाणवते ती म्हणजे कोणताही विचार अतिशय प्रभावीपणे फूलवून, रंगवून ते मांडत असत. त्यात रंजकता, अश्लिलता, कल्पकता नसे. जीवनवादी दृष्टीकोणातून वास्तववादी विचार यशवंतरावांच्या भाषणांतून येत असे. जीवनात कोणाचेतरी अनुकरण करण्यापेक्षा स्वत:च स्वत:च्या जीवनाचे शिल्पकार व्हावे असा महान विचार त्यांच्या विचारांमधुन येतो. यशवंतरावजी चव्हाण मोठे मर्मग्राही दर्दी साहित्यिक तसेच उत्तम वक्ते व उत्तम श्रोते सुध्दा होते. यशवंतरावांच्या भाषणांतून प्रकटणारे सोहार्द, मार्दव आणि स्नेहभाव शब्दागणिक ओसंडत होता. या नेत्याचे भाषण ऐकण्यासाठी हजारोंच्या संख्येने जनसमुदाय जमत असे. 'लोकमत' साप्ताहिकाचे संपादक वामनराव सावंत यशवंतरावांच्या भाषणाबाबत म्हणतात - ''यशवंतरावांची जाहीर व खाजगी स्वरूपाची भाषणे ही त्यांच्या प्रवृत्तीची द्योतक आहेत. त्यांची जाहीर सभांतील व्याख्याने मूलग्राही उद्‌बोधक व नवनव्या विचारांनी ओथंबलेली असतात. त्यामधून त्यांचे व्यक्तिवैशिष्टय व संशोधक वृत्ती दिसून येते. सुशिक्षित व अशिक्षित श्रोत्यांना ती सारखीच आकर्षित करून घेतात व आपण काहीतरी नवे विचारधन आपल्या संग्रही जमा केले असावे, असे श्रोत्यांना वाटल्याखेरीज राहात नाही.''[२१] म्हणूनच यशवंतरावांच्या भाषणांमध्ये विविधांगी पैलू दिसून येतात.

## ८) भाषाप्रभुत्व :-

यशवंतरावांची भाषणे ही मराठी भाषेवर प्रभुत्व दाखविणारी आहेत. यशवंतरावांनी साध्या, सोप्या भाषेतून शब्दांवर हुकुमत गाजविली होती.प्रचंड वाचनातून त्यांच्याजवळ शब्दसंपत्तीचे अमोघ सामर्थ्य होते. अनेक विषयांवर ते विचार मांडत असताना सामाजिक, राष्ट्रीय, नैतिक मूल्यांची जोपासना करतात. शिवाय त्यांच्या विचारांची व्यापकता अथांग होती.विचाराला चिंतनाची आणि कृतीची जोड होती.आत्मविश्वासातून ते बोलत असत. समाज, शिक्षण, सहकार, सांस्कृतिक, शेती,

भाषा, आर्थिकता इ. विविध विषयांवर ते अतिशय मार्मिकपणे विचार मांडत. विचारांची खोली, व्याप्ती व विस्तार निबंधासारखा आहे.त्यांच्या या मौलिक विचारांतून, चिंतनातून सुसुत्रता आढळते. सभ्य व शालीनता दिसते. सौंदर्यावरची फक्त आसक्ती न दिसता त्यातील आत्मिक स्नेह जाणवतो. सुसंस्कृतपणाच्या खुणा जाता जाता मोठ्या नम्रतेने ते दाखवून देतात. राष्ट्रीय अस्मितेचा कणा हा राष्ट्राच्या संस्कृतीवर उभा असतो हे सांगताना ते म्हणतात – ''साहित्याचा आणि संस्कृतीचा, विचारवंतांचा आणि लेखकांचा जन्म खरोखरी कशासाठी होत असतो? मी तर असे मानतो की, मानवी मनात अनेक मूक आशा आकांक्षा असतात. कल्पना असतात आणि त्या प्रकटीकरणासाठी, व्यक्तिमत्वासाठी, एक प्रकारे हाकां मारीत असतात.शब्दासाठी त्या भुकेलेल्या असतात, तहानलेल्या असतात. त्यांच्या हाकेला ओ देऊन लेखक, विचारवंत, संशोधक व शास्त्रज्ञ त्यांना लेखनद्धारा शब्दरूप देत असतात.''[२२] भाषासिध्दीवर यशवंतरावांचे भाषण अतिशय उठून दिसत असे.

यशवंतरावांच्या भाषाशैलीला स्वत:चे वेगळेपण दिसते. साधी भाषा पण जनसमुहाच्या ह्दयाला भिडणारी असे. सामाजिक आणि शैक्षणिक विचारांतुन त्यांची सामाजिक दृष्टी प्रगतशील विचाराची दिसून येते. मराठी भाषेवर जिवापाड प्रेम करणारे यशवंतराव मराठी भाषेतून अतिशय प्रभावीपणे बोलतात. मराठी भाषेला इतिहासाने वस्त्र दिले तर भूगोलाने ते शिवून मराठी भाषेच्या अंगावर घातले व तिच्या रूपात भर टाकली अशी त्यांची मराठी विषयीची विचारसारणी दिसून येते. भाषेवर संस्कार झाल्याने समृध्द अशी शब्दरचना त्यांची असे. यशवंतरावांनी शब्दाचे महत्व जाणले होते. त्यांच्या भाषणांतून जीवनाबद्दलची सखोल चिंतनशीलता दिसून येते. शब्द हेच धन आहे, रत्न आहे, शस्त्र आहे. त्यांच्या मदतीशिवाय कोणतेही काम पूर्ण होत नाही म्हणूनच त्यांची भाषणे भाषासिध्दीवर, शब्दसिध्दीवर प्रभुत्व असणारी आढळतात.

यशवंतराव हे जरी राजकारणात होते तरी त्यांचे मन नेहमी समाजकार्यात असे. त्यामुळे समाजसंगराचा हा सेनापती समाजाला आपले विचार समजावून सांगत असे. त्यांचेच प्रश्न, समस्या असल्यामुळे आणि त्यांना समजेल, उमजेल अशी भाषा वापरल्यामुळे ती भाषणे , त्यातील विचार श्रोत्यांना अतिशय जिव्हाळ्याचे वाटत असत. तरूणांना स्फूर्ती प्रेरणा देत असताना त्यामध्ये समाजातील उदाहरणे देऊन त्यांना दिलासा देण्याचा यशवंतराव प्रयत्न करीत असत. अतिशय विनम्रपणे ते आपले मत समजून सांगत.त्याच्यामध्ये अतिशय प्रेमळ, लाघवी भाषा असे. द्वेष, मत्सर, चीड किंवा

उथळ शब्दांचा वापर नसे. अतिशय मंगलमय, पवित्र विचारांची उधळण करीत असताना ते भाषेचा तोल सांभाळत असत. समाज व्यवस्थेसारख्या विषयांवर बोलताना त्यांची भाषा अंतरिक तळमळीची असे.

यशवंतरावांची भाषासमृध्दी अतिशय परिपक्व असे.शेतकऱ्यांना ते म्हणतात - ''शेतकरी बांधवांनो तुमच्या अकलेचा सुगंध जमिनीत मिसळा व देशाचे नंदनवन करा. कोर्टाच्या पायऱ्या झिजवण्यापेक्षा आधुनिक तीर्थक्षेत्र बनलेल्या कोयनानगर, भिलाई, भाक्रानांगल इ. ठिकाणांना भेटीं द्या. कोयनेची वीज म्हणजे मोठ्या घरची लेक आहे. ती आपल्या घरी नांदावी असे वाटत असेल तर तुमच्या घरी तांत्रिक शिक्षण घेऊन मुले तयार केली पाहिजेत.''[२३] अशा तऱ्हेच्या मोहक भाषेतून अतिशय मार्दवतेने सौंदर्याचा साज चढवित ते आपली भाषणे प्रभावीपणे मांडतात.तसेच सरळ विचाराला भिडण्याची आणि तो विचार ठाशीवपणे मांडण्याची वृत्ती यशवंतरावांची दिसते. यशवंतरावांनी नेहमीच चांगल्या शब्दापेक्षा चांगले विचार देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांचा एक विचार एक एक दिशा देणारा ठरतो.

वक्तृत्वामध्ये भाषेला अतिशय महत्वाचे स्थान असते. अभिव्यक्तीपेक्षा आशयाला महत्वाचे स्थान देणारे यशवंतराव आशय मांडताना भाषाप्रभुत्वावर भर देतात. भाषाशैलीत वक्तृत्वाचा घाट असल्यामुळे ती प्रवाही ठरते. भाषेला वाङ्मयीन मूल्य प्राप्त झाले तर ती भाषा अतिशय प्रभावी ठरते. यशवंतरावांच्या भाषणामध्ये वास्तववादी विचारालाही वाङ्मयीन सौंदर्याची किनार लाभल्यामुळे ती भाषणे अतिशय प्रभावी, रसिकजनांच्या मनाला मोहिनी घालणारी ठरतात.

## ९) यशवंतरावांचा जीवनवादी दृष्टीकोन :-

यशवंतराव कोणत्याही क्षेत्रात 'माणूस' हाच महत्वाचा केंद्रबिंदू मानतात. आपल्या समोर माणसाला ठेवून ते विचार करीत आणि मांडीत जातात.त्यांना माणसाचा लळा होता. माणसाची अपार माया त्यांनी जोडली होती. माणसाला माणूसपण मिळावे या भूमिकेशी ते ठाम होते. माणसा-माणसांनी मिळून समाज घडतो या समाजाला प्रगतीपथावर नेण्यासाठी 'माणूस' हा घटक जबाबदार असतो.या मानवाची जडणघडण योग्य झाली तर त्याच्या जीवनाचे खऱ्या अर्थाने सार्थक होते. माणूस घडविण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. कर्तृत्ववान माणसासंबंधी यशवंतराव सांगतात - ''कुठल्याही समाजातील कर्तृत्ववान मनुष्य हा समाजाला सोडून कर्तृत्व करूच शकत नाही. नवनीत

म्हणजे आपण ज्याला लोणी म्हणतो ते दुधातून येते. दूध नसले तर लोणी नाही. समाजजीवन जेव्हा खवळलेले असते त्यामध्ये साचत असते नवनीत निर्मिणाऱ्या दुधाप्रमाणे त्यात एक शक्ती असते. नवनीताला स्वतंत्र अस्तित्व असते ही खोटी गोष्ट आहे.''[२४] अशा कर्तृत्ववान माणसांना नेहमी कुठल्यातरी विचारांचा, कुठल्यातरी ध्येयांचा नाद लागलेला असतो त्यातून त्यांचे कर्तृत्व घडते असा दृष्टीकोन त्यांच्या भाषणातून जाणवतो.

यशवंतरावांच्या सर्व भाषणांमधून आपल्याला एक जीवनवादी दृष्टीकोन नेहमी जाणवत असतो. ते म्हणतात - '''कलेसाठी कला' की 'जीवनासाठी कला' हा ही वाद पूर्वी फार गाजलेला आहे. मराठी साहित्यात अजूनही त्याचे पडसाद अधुनमधुन उमटत असतात. माझ्यापुरते बोलायचे झाले तर माझा कल 'जीवनासाठी कल' या तत्वाकडे झुकलेला आहे. केवळ शब्दलालित्य आणि प्रतिमांचे सौंदर्य हीच चांगल्या साहित्याची कसोटी आहे, असा 'कलेसाठी कला' याचा अर्थ असला तर ही स्वत:ची फसवणूक करून घेणे होय.''[२५] अशी जीवनवादी भूमिका त्यांनी मांडलेली आहे.

जीवनातील वास्तव अतिशय लाघवी अन् मृदू भाषेत ते मांडतात. ते एके ठिकाणी म्हणतात - ''त्या काळी खेड्यापाड्यातून किंवा गावाच्या बाजूने दुपारी आपण गेलो तर काही हालचाल दिसत नसे. सर्व गाव जणू काही झोपल्यासारखे वाटे. शेतीवर जेथे विहीर असे तेथे विहीरीतून पाणी काढल्याचा आवाज क्वचित ऐकू यावयाचा. दुपारच्या उन्हाने थकून भागून गेलेली माणसे आणि जनावरे चुपचाप पडून असावयाची. पडझड झालेली जीर्ण घरे, मोडकळीस आलेले वाडे आणि तुटलेली शेती हे त्या काळच्या महाराष्ट्रातल्या खेड्यांचे स्वरूप होते. अद्यापही थोडीफार हीच अवस्था आहे.''[२६] अशा सामाजिक परिस्थितीचे अतिशय हळूवारपणे सुक्ष्म निरीक्षण ते करतात. भाषणांतील वर्णन चपखलपणे करून रसिकांची मने वेधून घेतात.समाजाच्या विकासासाठी डोळस दृष्टीकोन हवा. आंधळा दुनियेत हिंडू शकेल पण आंधळ्याच्या मागे दुनिया जाऊ शकणार नाही असा विचार ते ठामपणे मांडतात. मानवी जीवनाला नदीची उपमा दिली जाते. नदीच्या प्रवाहाप्रमाणे माणसाचे जीवनही सतत प्रवाही असते.ज्या कृष्णा-कोयना नदीच्या काठी त्यांचे जीवन वाढले घडले. याच मानवी जीवनाविषयी कुतुहल त्यांना वाटत असे. सामाजिक आशयाच्या बाजूने जीवनवादाचा पुरस्कार करणारे यशवंतराव समाजाच्या आशा-आकांक्षा, भाव-भावना, सुख-दु:खे यांच्या जाणीवेतून जीवनवादी भूमिका ते स्विकारतात.

यशवंतराव जीवनाचे तत्वज्ञान मांडतात, आजच्या खऱ्या जीवनाची समीक्षा ते करतात, जीवन आणि साहित्य याचा परस्परसंबंध आहे. मानवी जीवनाचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. यशवंतरावांनी साहित्यातून मानवी जीवनाच्या विविध आंगोपांगावर दृष्टीक्षेप टाकलेला आहे. ते म्हणतात - ''साहित्याची अंतीम प्रेरणा मानवी मुल्यांची जाणीव करून देणारी असली पाहिजे असे मी मानतो.''[२७] असा जीवनवाद त्यांना अभिप्रेत होता.समाजाचं सर्वांगिण परिवर्तन यशवंतरावांना अपेक्षित होते. त्यांच्या समाजपरिवर्तनाच्या कामाला तर्कशुध्द आणि तात्विक आधार होता. ''महाराष्ट्रात विचारी समाज निर्माण व्हावा, तो सुसंस्कृत असावा, त्यांच्यात विज्ञानाबद्दलची आस्था निर्माण व्हावी आणि समाजानं स्वकष्टानं जीवन समृध्द बनवावं यासाठी ते अहर्निश व्यग्र राहिले. जातवार पध्दतीवर आधारलेली खेड्यातील समाजरचना नष्ट करून समता, बंधुता, स्वतंत्रता, न्याय असं नवीन मूल्यावर आधारित नवं ग्रामीण जीवन महाराष्ट्रात रूजविण्याचे विचार यशवंतराव आयुष्याच्या प्रारंभापासूनच मनात बाळगून होते.''[२८] मानवता मुक्त करण्याचा विचार यशवंतरावांनी साहित्यातून मांडला आहे.

यशवंतरावांचा समर्पित जीवन हा आदर्श होता - ते म्हणतात, ''जीवन पराकोटीचे समर्पित असेल, तर ते जीर्ण होत नाही. चंद्र कधी जुना होत नाही. सूर्याला म्हातारपण येत नाही. दर्या कधी संकोचत नाही. यातील प्रत्येकाच्या जीवनात पराकोटीचे समर्पण आहे. पण अनंतयुगे लोटली तरी विनाश त्यांच्याजवळ पोहचलेला नाही.काळाने त्यांना घेरलेले नाही. त्यांचा कधी कायापालट नाही. स्थित्यंतर नाही.ते निष्वसन अखंड आहे.''[२९] असे जीवनाविषयीचे तत्वज्ञान ते मांडतात. यशवंतराव सतत 'मी' पण विसरून स्वर्गीय आनंद देणाऱ्या प्रसंगाच्या अखंड शोधात असायचे. असा क्षण मिळणे हाच त्यांना विरंगुळा वाटायचा. असे क्षण जेवढे जास्त मिळतील तेवढे जीवन सुखी अशी त्यांची धारणा होती. सुखाच्या या क्षणांचे वर्णन ते करतात - ''जीवनात सुखाचे क्षण येतात, ते सूर्याच्या कोवळ्या किरणांसारखे सोनेरी व सतेज असतात. ते क्षणभर राहतात आणि नंतर कडक होतात. परंतु ज्यावेळी हे किरण कोवळे दिसतात, त्यावेळी त्यांचे ते तेज ते रम्य स्वरूप पाहून मनाला आल्हाद वाटतो, गंमत वाटते. नदीच्या खोल डोहात दगड टाकला की पाण्यावर तरंग उठतात, एकातून एक अशी वर्तुळे उठतात आणि पाहणाऱ्याला मोठी मजा वाटते. जंगलातल्या वाटेने जात असताना उन्हाच्या वेळी एखादा झरा दिसला की त्याचे पाणी पिताना केवढा आनंद होतो.

ओढ्याच्या काठी भरगच्च जांभळानी भरलेल्या झाडाची चार जांभळे तोंडात टाकली की, ती किती गोड लागतात... जीवनामधील आनंदाचे क्षण हे असे असतात.''[३०] असा जीवनवाद यशवंतराव साहित्यातून व्यक्त करतात.

लेखक भा.ल. भोळे या संदर्भात म्हणतात - ''यशवंतरावांचे हे जीवनभाष्य म्हणजे नितांत रमणीय काव्य आहे. आपल्या स्मरणसारणीत अशा सुखाच्या क्षणांची इतकी भरगच्च बांधणी यशवंतरावांनी करून ठेवली होती, की राजकीय धकाधक असो की राजकीय विजनवास, कपटकारस्थांनी वेढले असो की आव्हानांनी त्रस्त केलेले असो, यशवंतरावांचे मानसिक संतुलन कधीच आटणारा नव्हता, कुणाला तो हिरावून घेणेही सर्वथैव अशक्य होते.''[३१]

असा साहित्य आणि जीवन यांचा जवळचा संबंध यशवंतरावांच्या साहित्यातून दिसतो.

## १०) सामाजिक जाणिवांचा प्रत्यय :-

सामाजिक जाणीव ही माणसाचे सांस्कृतिक मूल्य जोपासणारी आहे. वक्ता जेव्हा व्यक्तिगत जीवनानुभव घेत असतो तेव्हा या अनुभवांना सामाजिक जाणीवेची पार्श्वभूमी असते. यशवंतरावांनी आपल्या भावानुभवाचा शोध सामाजिक पातळीवर आणि सामाजिक जाणिवेच्या संदर्भात घेतलेला आहे. याचीच अभिव्यक्ती त्यांच्या भाषणातून आलेली आहे. खऱ्या अर्थाने यशवंतरावांनी 'समाज' हा घटक अतिशय महत्वपूर्ण मानलेला आहे. याच सामाजिक जाणीवेतून त्यांनी जीवनवाद आणि वास्तववाद याला अधिक महत्व दिले आहे. ''वाङ्मयीन कलाकृती भोवतीच्या सांस्कृतिक, आर्थिक , वाङ्मयीन, नैतिक आणि सामाजिक संदर्भातूनच साकार होत असते. या सर्वांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम वाङ्मय कृतीत मुखरित होत असतो. साहित्य हे समाजजीवनाचे महत्वाचे अंग असून इतर अंगाशी त्यांचे अंगभूत नाते असतेच. साहित्याचे विश्व हे त्यामुळेच सांस्कृतिक विश्व ठरते. काही केले तरी साहित्यकृतीला जीवनापासून तोडता येत नाही.''[३२] यशवंतरावांच्या साहित्यातून मानवी मूल्यांचा, सामाजिक जाणीवांचा प्रत्यय येतो.

साहित्याचा आणि समाजजीवनाचा असणारा संबंध यशवंतरावांना अपरिहार्य वाटतो किंबहुना समाजजीवनाचे वास्तव चित्रण परिणामकारकतेच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. समाजजीवनात घडणाऱ्या अनेकविध घडामोडीसंबंधीची उत्सुकता आणि ओढ

जेथे कलावंत मनाला वाटत असते आणि त्या घडामोडी तो आपल्या साहित्यातून मांडत असतो अशाच ठिकाणी 'सामाजिक जाणीव' ही संज्ञा वापरली जाऊ शकते. अशी सामाजिक जाणीव यशवंतरावांच्या साहित्याचे महत्त्वपूर्ण असे वेगळेपण आहे.सामाजिक प्रगती, सामाजिक जडणघडण, आर्थिक संबंध, समाजातील अंत:प्रवाह, सामाजिक समस्या - त्यांचा उहापोह, समाजातील दैन्य, पिळवणूक, गुलामगिरी या सगळ्यांची सामाजिक जाणीव त्यांच्या भाषणातून येते. सामाजिक वास्तवचा प्रत्यय त्यांच्या भाषणातून जाणवतो. ते म्हणतात - ''कुठल्याही समाजामधील कर्तृत्ववान मनुष्य हा समाजाला सोडून कर्तृत्व करूच शकत नाही.''[33] असे समाजाचे मानवी जीवनातील महत्त्व ते सांगतात. सामाजिक प्रगती हा त्यांच्या साहित्याचा महत्वाचा 'गाभा' असल्याचे दिसून येते. यशवंतरावांनी आपल्या भाषणांतून समाजातील सर्व घडामोडींवर प्रकाश टाकून त्यावर चिकित्सक बुध्दीने आपले विचार मांडलेले आहेत.

यशवंतराव सामाजिक जाणीवेतून म्हणतात - ''समाजवाद हे एक सामाजिक, आर्थिक तत्वज्ञान असून भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे दोष दूर सारण्यासाठी ते अस्तित्वात आले आहे. व्यक्तीचे हितसंबंध सामाजिक कल्याणापेक्षा दुय्यम ठरविणे, आर्थिक विकासापेक्षा मानवी मूल्ये, मानवी प्रतिष्ठा व कल्याण यांना प्राधान्य देणे, विकासाचे अर्थकारण व सामाजिक न्यायाचे अर्थकारण यांचा समन्वय केला जाणे आणि मुख्य म्हणजे आधुनिक, विवेकपूर्ण, समताधिष्ठित आणि मानवी स्वरूपाची समाजव्यवस्था अस्तित्वात आणणे गरजेचे आहे.''[३४] अशी समाजवादाची त्यांची संकल्पना होती. विचारांना त्यांनी आचारयुक्त कृतीची जोड दिल्याने त्यांची सामाजिक तळमळ यातून जाणवते. यशवंतरावांच्या सर्व भाषणाचा गाभा 'समाजजीवनाची प्रगती' हाच आहे. ते म्हणतात - ''साहित्य हे 'थर्मामीटरमधील पाऱ्याप्रमाणे संवेदनशील' असले पाहिजे. साहित्यिक मूल्ये आणि सामाजिक, राजकीय मूल्ये त्यांना अविभाज्य वाटतात. साहित्याची अंतिम प्रेरणा मानवी मूल्यांची जाणीव करून देणारीच असली पाहिजे.जे मानवी मूल्ये प्रतीत करते तेच अक्षरवाङ्मय ठरते.''[35] असा सामाजिकतेचा महत्त्वपूर्ण विचार त्यांनी साहित्यातून मांडलेला आहे.

यशवंतरावांच्या साहित्यातील सामाजिकता व सामाजिक जाणीव ही समाज परिवर्तनाची प्रेरणा देत असते. सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांचा व वैशिष्टयांचा सूक्ष्म विचार करणे, विज्ञानयुगाने व नवजीवनाने निर्माण केलेल्या नवजाणिवांचा स्विकार-प्रसार करणे आणि समाजाचे प्रबोधन करणे ही त्यांच्या साहित्याची प्रयोजने

आहेत. सामाजिक वास्तवतेचे भान त्यांनी आपल्या साहित्यातून जोपासल्याचे प्रत्ययास येते.

## ११) समुचित संदर्भ :-

यशवंतरावांचे सचिव श्री राम खांडेकर म्हणतात - "साहेब रोज बारा ते पंधरा तास काम केल्यानंतर रात्री जेवणानंतर तास दीड तास वाचन केल्याशिवाय झोपत नसत. दिवसाही सवड मिळाल्यास अधूनमधून वाचन चालू असे. वाचनाची शैली मात्र वेगळी. एकाच वेळी पाच-सहा पुस्तके हाती घ्यायचे, प्रत्येकातील काही पाने वाचायची.प्रवासात वाचण्याची पुस्तके, मासिके निराळी असायची. दिल्लीत आल्यानंतर जबाबदारीप्रमाणे पुस्तकांचे विषयही अनेक होत गेले. पुस्तकाची निवड ते बारकाईने करीत. पुस्तक ते मनन करून वाचीत असत.त्यांनी वाचलेल्या पुस्तकातील मजकूर ते विसरत नसत."[३६] यातून यशवंतरावांनी कधीकाळी वाचून मनात साठवून ठेवलेल्या वाङ्मयीन कलाकृतीचे समुचित संदर्भ वाचन-मनन-चिंतनाचा निदिध्यास जडलेल्या यशवंतरावांना प्रवासात अचूक आठवत असत. बोलताना माहितीच्या अफाट साठ्यातून आयत्यावेळी योग्य असे संदर्भ ते देत असत.

यशवंतरावांनी जीवनामध्ये अनेक गोष्टींचा अनुभव घेतला, प्रवास केला, वाचन केले यातील सूक्ष्म निरीक्षणातून जे भावले ते आपल्या भाषणांमध्ये अधे-मधे समर्पक उदाहरणांतून त्यांनी मांडले. त्यांच्या भाषणांमध्ये अनेक ठिकाणी या सर्व गोष्टींचा प्रत्यय आल्याचे लक्षात येते. शिवाजी महाराज, डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन, म. गांधी, पं. नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छ. शाहू महाराज यांच्या विचारांचे आदर्श त्यांनी जपले होते. आपल्या भाषणांतून यांची उदाहरणे दाखले ते देत आणि समाजासमोर आदर्श ठेवत असत. ते म्हणतात - "छत्रपती शिवाजी महाराजांची ही मूर्ती त्यांची निव्वळ प्रतिमा आहे असे आम्ही मानीत नाही, तर भारतामध्ये जी तेजस्विता आहे, भारताची जी अस्मिता आहे, भारताचा जो स्वाभिमान आहे त्या तेजस्वितेचे, त्या अस्मितेचे आणि त्या स्वाभिमानाचे ही मूर्ती एक प्रतीक आहे अशी आमची तिच्या पाठीमागची भावना आहे."[३७] अनेक भाषणांतून ते समुचित संदर्भ देऊन श्रोत्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करत.

१२) तरूणांना प्रेरणा :-

देशाचा आधारस्तंभ म्हणून आपण ज्यांच्याकडे आशेने पाहतो तो तरूण वर्ग यशवंतरावांना अतिशय महत्त्वाचा वाटतो. त्यांच्या अनेक भाषणांमधून तरूणांबाबत आशावादी दृष्टीकोन दिसून येतो. उगवत्या पिढीकडून यशवंतराव देशाच्या उन्नतीबाबत अपेक्षा बाळगतात. त्यांच्यासमोरील आव्हाने कोणती आहेत हे सांगण्याचा प्रयत्न करतात. आजच्या युवकांमधील वैफल्याची भावना यशवंतरावांना अस्वस्थ करते. देशाचा भविष्यकाळ जर वैफल्यग्रस्त बनला तर भावी देशाचे काय होणार असा विचार यशवंतरावांच्या भाषणांतून दिसून येतो.

शिक्षणातून तरूणांनी विकासाची संधी प्राप्त करावी, त्यातून समाजप्रबोधन करावे, समाजसेवा करावी, देशाच्या हिताच्या दृष्टीकोनातून कार्य करावे, ग्रामीण जीवनात शिक्षणाचा उपयोग करून ग्रामीण भागाचा विकास करावा, देशप्रेम-एकात्मता जोपासली जावी, समाजातील जातीयवाद नष्ट करावा, स्त्री शिक्षणाचे महत्त्व समाजास पटवून द्यावे, समानतेच्या तत्त्वाचा अवलंब करावा इ.बार्बींची जबाबदारी तरूणांची असल्याचा विचार यशवंतरावांच्या अनेक भाषणांतून प्रत्ययास येतो. त्याचबरोबर आजच्या तरूणांची निराशाजनक अवस्था यशवंतरावांनी सांगितलेली आहे. ते म्हणतात - "आजकाल तरूण मंडळी काहींशी रागावलेली आहेत. आपण मिळविलेले शिक्षण प्रत्यक्ष जीवनातील काही प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत निरूपयोगी आहे, पदवी मिळाली तर नोकरी मिळत नाही, सामाजिक दर्जा सुधारत नाही, आर्थिक परिस्थिती बदलत नाही असा अधिकाधिक नकारात्मक अनुभव आल्याने तरूणांचा भ्रमनिरास होऊ लागला आहे."[३८] स्पर्धात्मक युगातील युवकांची दिशाहिन अवस्था झाल्याचा विचार यशवंतरावांच्या भाषणांतून येतो.

यशवंतरावांच्या भाषणाचा मुख्य गाभा नवसमाज निर्मिती असल्याचे प्रत्ययास येते.तरूणांनी हा समाज उभा करण्यासाठी सभोवतालच्या परिस्थितीचा अभ्यास करून त्यांच्या समस्या-अडचणी यांची दखल घेऊन त्याकामी प्रयत्न करण्याचा विचार यशवंतरावांच्या भाषणांतून दिसून येतो. शिक्षणाचा समाजास उपयोग व्हावा या दृष्टीने तरूणांनी संघटितरित्या कार्यरत रहावे असा विचार यशवंतरावांच्या अनेक भाषणांतून जाणवतो. 'चारित्र्यनिर्मिती' हा शिक्षणाचा महत्त्वाचा उद्देश त्यांच्या लेखनातून लक्षात येतो. सामाजिक समता, आर्थिक समानता जोपासण्याचा विचार त्यांच्या समग्र भाषण वाचनानंतर प्रत्ययास येतो. नीतीमूल्यांचे संवर्धन हे शिक्षणातून करण्याबाबतची भूमिका

यशवंतरावांच्या भाषणांतून जाणवते. आधुनिक युगातील आव्हाने लक्षात घेऊन तरूणांनी समर्थपणे जीवनास सामोरे जावे हा यशवंतरावांच्या भाषणातील महत्त्वाचा विचार तरूणांना स्फूर्ती आणि प्रेरणा देणारा ठरतो.

समाज प्रवाहांनुसार जात असताना तरूणांनी सामाजिक प्रबोधनासाठी प्रवाहाविरूध्द जाण्याची तयारी ठेवावी ही भूमिका यशवंतरावांच्या भाषणांतून जाणवते. यशवंतरावांच्या भाषणाच्या समग्र वाचनातून तरूणांना प्रेरक ठरणारे विचार, दिशा दाखवणारे मार्ग सापडतात. अनेक शैक्षणिक कार्यक्रमांच्या निमित्ताने त्यांनी तरूणांना मार्गदर्शक ठरतील असे विचारमंथन केल्याचे दिसून येते. आजच्या पिढीला मोलाचे मार्गदर्शन यशवंतरावांच्या अनमोल भाषणांतून मिळते.

## १३) सामान्य माणूस हा केंद्रबिंदू :-

यशवंतरावांच्या भाषणाचा मुख्य केंद्रबिंदू हा 'सामान्य माणूस' असलेला दिसून येतो. त्यांच्या समग्र भाषणविचारातून सामान्य माणसाचा विकास, उन्नतीबाबतचे विचार दिसून येतात. व्यक्ती कोणत्याही जातीची, धर्माची असेना का परंतु तिच्यामध्ये मानव्याची जोपासना असली पाहिजे असे ते सांगतात. लोकशाही ही सामान्य माणसांना महत्त्व देणारी असली पाहिजे आणि या सामान्य माणसाच्या विकासाचा, कल्याणाचा कार्यक्रम राबविणारी असावी अशी त्यांची विचारसारणी असल्याचे दिसून येते.

कोणत्याही विकासकामामध्ये 'माणूस' हेच महत्त्वाचे लक्ष असावे या विचाराचे यशवंतराव आपल्या भाषणांतून म्हणतात - ''विकासाच्या कुठल्याही योजनेमध्ये माणूस हा अत्यंत महत्त्वाचा भाग मानला पाहिजे कारण विकास हा जरी विकासाची साधने निर्माण करण्यामुळे मुख्यत: होत असला तरी त्या साधनांचा वापर करणारा जो मनुष्य आहे त्याचा विकास हीच योजनेतील शेवटी फार महत्त्वाची गोष्ट आहे.''[३१] अशी सामान्य माणसाविषयीची आंतरिक तळमळ त्यांच्या भाषणांमधून दिसून येते. तळागाळातील माणसांपर्यंत शासनाच्या सर्व योजना पोहचल्या पाहिजेत अशी भूमिका त्यांच्या भाषणांतून जाणवते.

यशवंतरावांच्या विचारांमागे मानवतावादी दृष्टीकोन असल्याचे दिसून येते. कुटुंबाचा, गावाचा, भागाचा, प्रदेशाचा, राज्याचा विकास साधण्याविषयीचे विचार त्यांच्या भाषणांतून येतात. संपूर्ण भारतीय मानवी समाजाचे कल्याण हे आपले अंतिम ध्येय असल्याचे त्यांच्या विचरांतून प्रकट होते. मानवी जीवन, त्यांची उत्पत्ती, विकास,

त्यांची सुख-दु:खे, समस्या, अडचणी या समजावून घेऊन सरकारने सामान्य माणसाचे जीवनमान उंचाविण्याचा प्रयत्न करावा अशी भूमिका त्यांच्या विचारांमागे दिसून येते. संपूर्ण मानव जातीच्या विकासाबाबतचे विचार यशवंतरावांनी आपल्या भाषणांमधून मांडल्याचे लक्षात येते. म्हणजेच सामान्य माणूस हाच यशवंतरावांचा केंद्रबिंदू असल्याचा प्रत्यय त्यांच्या समग्र भाषणांतून येतो. यशवंतरावांनी अतिशय मार्मीक विचारांतून आपले चिंतन व्यक्त केल्याचे दिसून येते.

१४) शैक्षणिक दृष्टी :-

मानवी जीवनातील शिक्षणाचे महत्त्व समाजास पटवून देण्याबाबतचा विचार यशवंतरावांच्या भाषणांतून येतो. सर्वांना सर्व प्रकारच्या शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे ही भूमिका यशवंतरावांच्या भाषणामध्ये असल्याचे दिसून येते. तरूणांना शिक्षणाची समान संधी, स्त्री शिक्षणाचे महत्त्व, मोफत शिक्षणाची सोय, उच्च शिक्षणाबाबतची सामाजिक दृष्टी, उपेक्षित-वंचित समाजास शिक्षणाची संधी मिळणे आवश्यक, शिक्षणाचा व्यक्ती-समाज जीवनास उपयोग, शिक्षणातून देशाची प्रगती इ. विषयांवर यशवंतरावांनी विचार मांडल्याचे त्यांच्या भाषणांतून दिसून येते.

ग्रामीण जीवनातील शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा ग्रामीण जीवन मंगलमय करण्याचा असावा असाविचार ते आपल्या भाषणांतून मांडतात.मानवी जीवनाचा सर्वांगिण विकास हा शिक्षणातूनच होत असल्याचा विचार यशवंतरावांच्या भाषणातून येतो. शैक्षणिक विकास निर्माण व्हावा या संदर्भात ते म्हणतात - ''येत्या बारा ते पंधरा वर्षाच्या काळामध्ये शिक्षणाचा हा प्रचंड प्रवाह महाराष्ट्रातील प्रत्येक शहरात व प्रत्येक खेड्यात पोहचला पाहिजे आणि त्यातून खेड्यातील नवीन पिढी सुशिक्षित झाली पाहिजे.शिक्षणाद्धारा होणारी ही क्रांती झालीच पाहिजे असे एकही घर राहता कामा नये की, जेथे उच्च शिक्षणाची संधी पोहचलेली नाही. ही शैक्षणिक क्रांती समाजामध्ये अशी जबरदस्त शक्ती निर्माण करील की, ती शक्ती आपल्याला गप्प बसू देणार नाही.''[४०] असे शिक्षणाचे महत्व समाजास सांगण्याचा यशवंतराव प्रयत्न करतात.

शिक्षणातून समाजीतील अंध:श्रध्दा, रूढी, परंपरा, अज्ञान, अन्याय, अत्याचार, जातीयता इ.अनिष्ट वृत्ती झुगारून लावल्या पाहिजेत असे यशवंतरावांनी सांगितलेले आहे. समाजाच्या उत्कर्षासाठी, आर्थिक विषमता नाहीशी करण्यासाठी, माणूस विचाराने मुक्त होण्यासाठी, समानतेच्या तत्त्वाचा स्विकार करण्यासाठी आणि देशाच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी शिक्षणाची गरज असल्याचे ते सांगतात. शिक्षणातून समाजाची आर्थिक,

सामाजिक, औद्योगिक प्रगती होत असते म्हणून शिक्षण ही आजच्या काळाची आवश्यक गरज असल्याचे यशवंतराव सांगतात.

यशवंतरावांचे शिक्षणविषयक विचारमंथन हे सखोल चिंतनातून आलेले आहे. शैक्षणिक विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी अतिशय प्रभावी शैलीचा वापर केला आहे. शिक्षण ही समाजाची शक्ती असल्याचा विचार त्यांनी भाषणांतून मांडलेला दिसून येतो. त्यांची शिक्षणविषयक भूमिका अतिशय आशावादी असल्याची त्यांच्या भाषणांतून प्रत्ययास येते. त्यांचे शिक्षणविषयक आत्मचिंतन समाजास शिक्षणाभिमुख दिशा देणारे ठरते.

१७) मराठी भाषेचा अभिमान :-

यशवंतरावांच्या अनेकविध भाषणांतून मराठी भाषेविषयीचा अभिमान दिसून येतो.मराठी भाषा ही प्रथम दर्जाची भाषा ते मानत. तिला राज्यभाषेचा दर्जा यशवंतरावांनी मिळवून दिला. लोकजीवन समृध्द करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणून यशवंतराव मराठी भाषेकडे पाहतात. मराठी भाषेविषयीचा अभिमान महाराष्ट्राने जपला पाहिजे असा विचार त्यांनी मांडलेला आहे. लोकभाषा ही ज्ञानभाषा झाली पाहिजे अशी भूमिका यशवंतरावांची असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील सर्व व्यवहार हे मराठी भाषेतून होऊन मराठीचा विकास झाला पाहिजे असे त्यांना वाटते.

महाराष्ट्रवासियांनी आपले लेखन समृध्द करण्यासाठी जगातील सर्व ज्ञान मराठीभाषेत आणले पाहिजे त्यातुनच मराठी भाषा ही विचारप्रवाही, विचारवाही होईल असा विचार यशवंतरावांच्या भाषणांतून येतो. भांषेच्या विकासाची, अभ्यासाची आवश्यकता असल्याचे यशवंतराव सांगतात. संशोधनाचे कामही भाषेमधून व्हावे "मराठी भाषेचा तुमचा आमचा अभिमान जर खऱ्या अर्थाने पहिल्या प्रतीचा राहणार असेल तर हे काम मराठी भाषेमध्ये ही झाले पाहिजे."[४१] असा विचार यशवंतरावांनी मांडलेला आहे. त्यासाठी वेगवेगळे वाङ्मय हे मराठी भाषेत आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे असे ते सांगतात.

थोडक्यात मराठी भाषेचा विकास, दर्जा टिकविण्याविषयीचा विचार यशवंतरावांच्या भाषणामध्ये आढळतो. तसेच मराठी भाषा ही राजभाषा व्हावी, ती अभ्यासाची, संशोधनाची भाषा बनावी असा विचार यशवंतरावांच्या भाषणांमधून प्रत्ययास येतो. मराठी भाषा समृध्द बनविण्याचा मानस यशवंतरावांचा असल्याचा दिसून येतो. अत्यंत जिव्हाळ्याची, प्रेमाची मराठी भाषा बनावी असे त्यांना वाटते. मराठी

भाषेचे संवर्धन करण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले. ते म्हणतात - ''मराठी भाषेचे राज्य यशस्वी करण्यासाठी, मराठी माणसांच्या मनात जो ज्ञानेश्वर आहे, जो राम आहे, जो तुकाराम आहे आणि त्याच्या मनात जी मराठी माऊली आहे त्या सर्वांना जागे करण्याचा माझ्या शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी प्रयत्न करीन.''[४२] यावरून मराठी भाषेविषयीचा यशवंतरावांचा आत्यंतिक जिव्हाळा दिसून येतो. मराठीची अस्मिता जोपासण्याचा विचार यांनी मांडलेला आहे.

१६) यशवंतरावांच्या शब्दाचे सामर्थ्य :-

यशवंतरावांची भाषणे वाचत असताना त्यांच्या शब्दाशब्दामध्ये ताकद असल्याचे जाणवते. त्यांच्या शब्दा-शब्दाच्या बांधणीतून सलग विचार येतात. त्यांचे वाचन, मनन असल्यामुळे प्रत्येकवेळी नवीन विचार रसिकांना ते देत असत. विचाराचा समतोल, मनाचा समतोल, विषयाचा समतोल त्यांच्या शब्दांमधून लक्षात येतो. ते म्हणतात - ''भाषा ही विचारांच्या पाठीमागे येत असते. भाषेचे खरे सामर्थ्य विचार व्यक्त करण्यात आहे.''[४३] असा विचार व्यक्त करताना शब्द ते अतिशय जपून वापरत असत. आशयाला अनुरूप अशी उदाहरणे देत असताना अतिशय मोजक्याच शब्दात ते देत असत.

यशवंतरावांच्या भाषणांतील शब्दांच्या अर्थछटांची वलये वाचकाच्या मनावर उमटत असतात. वाचकमनाची पकड घेण्याचे कसब त्यांच्या शब्दाशब्दातून लक्षात येते. ''शब्दांनी भावना पूर्णतया व्यक्त होतातच असे नाही आणि कधी कधी शब्दांनी गैरसमज व गोंधळ वाढण्याचा प्रकार घडतो असा माझा अनुभव आहे म्हणून शब्दाचा वापर करताना मी काळजी घेत आहे.''[४४] असे शब्दाबाबत म्हणणारे यशवंतराव शाब्दिक सामर्थ्याबाबत किती साक्षेपी आहेत हे स्पष्ट होते. शब्दांची योग्य निवड करून वक्तृत्वपूर्ण शैलीतून भाषणांतून श्रोत्यांना आकर्षून. घेण्याची करामत दिसून येते. मराठमोळी भाषाही, अर्थवाही, विचारवाही शब्दछटांमुळे यशवंतरावांची भाषणे रसिकमनाला जाऊन भिडत, आपली वाटत. यशवंतरावांची शब्दफेक प्रभावी असे. शब्दातून व्यक्ती, समाज उभा करण्याचे सामर्थ्य त्यांच्या भाषणांतून जाणवते.

## यशवंतरावांची भाषाशैली :-

यशवंतरावांच्या भाषणांची शैली अतिशय आकर्षक, मनाला मोहिणी घालणारी, मार्दव अन् रससंपन्न अशी होती. त्यांच्या वाणीतून मराठी बाणा प्रकट होत असे.

यशवंतरावांनी मराठी भाषणांच्या समृध्द संपन्न आणि वैभवशाली शैलीने एक वेगळेपण निर्माण केले. ओघवती, सरळ, साधी, सोपी भाषाशैली, स्वत:चा असा आगळावेगळा घाट निर्माण करणारी ठरते. यशवंतरावांनी वाचन, मनन, चिंतनातून भाषणांना वैचारिक बैठक दिली होती त्यामुळे वाङ्मयीन मूल्यांनी नटलेली भाषा त्यांच्या वाणीतून प्रकट होत असे.साहित्यिक दर्जा प्राप्त झालेली त्यांची भाषणे मराठी साहित्यात मोलाची भर टाकताना दिसतात. आलंकारिकता, वाक्प्रचार, हणी, विचार, सुभाषिते, कलात्मक वाक्यरचना त्यांनी निर्माण केली.

यशवंतरावांचा आवाज अतिशय विनम्र, मार्दव आणि शांत असे.बोलताना अर्थानुसार शब्दांत, वाक्यात चढउतार ते करीत असत. यशवंतरावांची शैली विवेकपूर्ण असे. त्यामध्ये द्वेष, मत्सर यांचा लवलेषही नसे. समयसूचकता हा त्यांच्या शैलीचा महत्वपूर्ण विशेष आहे. मिस्किल विनोदी शैलीतून ते गंभीर समस्येवर बोलत असत.वास्तवाचे, परिस्थितीचे भान ठेवून काळ, वेळ आणि विषयाचे तारतम्य बाळगून त्यांचे भाषण रंगत असे. प्र.के. अत्रे आणि यशवंतराव यांच्या शब्दकोट्या फार प्रसिध्द आहेतच. एकदा अत्रे अखिल भारतीय नाट्यसंमेलनामध्ये यशवंतरावांना उपरोधीत भाषेत म्हणाले - "मुंबईहून एवढा मोठा प्रवास करून मी आलो. रस्ते दगडधोंड्यांनी भरलेले. धूळ तर अवर्णनीय होती. मराठवाड्यातल्या रस्त्यावरची धूळ खात खात येथपर्यंत येऊन पोहोचलो. नामदार यशवंतरावांच्या राज्यात रस्त्याची ही स्थिती!" यशवंतरावांनी अत्र्यांच्या या प्रश्नाचे उत्तर अतिशय विनोदी पण मिस्किल शैलीत दिले ते म्हणाले - "आचार्य अत्रे यांनी धुळीची तक्रार केली पण नेहमी दुसऱ्याला धूळ चारणाऱ्याने एकदा तरी स्वत: धूळ खावी नां."[४५] अशा खुमासदार शैलीत यशवंतरावांनी त्यांना टोला मारला. यातून हजरजबाबीपणा किती चपखल होता हे लक्षात येते.

यशवंतराव चव्हाण बोलत असताना जणू सह्याद्रीचे वारे झंजावाताप्रमाणे वाहात आहे असे वाटे. जातीयवादावर बोलताना ते म्हणतात - "जन्मावरून दर्जा ठरविण्याचा हास्यास्पद प्रकार सुरू झाला. हा मुलगा अमुक खोलीत जन्मला म्हणून उच्च तर दुसरा अमुक खोलीत म्हणून कनिष्ठ असा भेदभाव आपल्या मुलामुलांतच एखादे कुटुंब करू लागले म्हणजे ते कुटुंब रसातळाला जाणारच"[४६] अशा सरळ साध्या भाषाशलीतून लोकशिक्षग, समाजशिक्षणाचे धडे श्रोत्यांना देत असत."माणसाचे मन शिक्षणाच्या संस्काराने अधिक संपन्न केल्याशिवाय समाज खऱ्या अर्थाने समाज बनत नाही."[४७] "व्यक्तीचे मोठेपण महत्त्वाचे नाही राज्याचे मोठेपण महत्त्वाचे आहे. ही गोष्ट आपण

कधीही विसरू नका.''[४८] अशी सौंदर्ययुक्त वाक्यरचना त्यांनी आपल्या भाषणांतून निर्माण केली.

यशवंतरावांच्या भाषणांमध्ये वाक्प्रचारांचाही वापर आहे. त्याचबरोबर म्हणी, आलंकारिकता अधे-मधे आलेली आहे. ''सासरी जावेसे वाटते पण माहेर सुटत नाही.''[४९], ''पुढच्यास ठेच मागचा शहाणा असे आपण साध्या जीवनामध्ये म्हणतो.''[५०], ''पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काळ''[५१], ''तुम्ही बोलता खूप पण करता मात्रफार थोडे''[५२], ''अनंत हस्ते कमलावराने''[५३] अशा सुभाषितांचा, म्हणींचा वापर त्यांच्या भाषणातील अभिजात सौंदर्यात अधिकच भर घालणारा ठरतो. त्यांच्या वक्तृत्वातील विचारांचा ओघही तितकाच नाविन्यपूर्ण आहे. शब्दसंपत्तीने नटलेली भाषणे अतिशय दर्जेदार ठरतात. लयबध्द रचना हा ही वेगळा पैलू त्यांच्या भाषणामध्ये दिसून येतो. ''ही ज्ञानाची ज्योत, शिक्षणाची ज्योत, विचाराची ज्योत, कल्पनांची ज्योत, ध्येयवादाची ज्योत एकदा प्रज्वलीत होऊन वाढली आणि कायम स्थिरावली की, हिंदुस्थानचे जीवन सुधारले आणि स्थिरावले असे तुम्हाआम्हाला म्हणता येईल.''[५४] यातून त्यांच्या भाषणातील सम्यकता, वस्तुनिष्ठता आणि देशाच्या जडणघडणीविषयीची आत्मियता निश्चितपणे प्रेरक ठरते.

रसाळ अन् प्रासादपूर्ण भाषा हा यशवंतरावांच्या भाषणाचा एक वेगळा डौल आहे. ''तिच्या अंत:करणाच्या अवकाशात मी स्थिरावतो. प्रशांत मनोभूमीवर पहुडतो, आत्मतेजाने तेजाळून निघतो, प्रेमामृताने ओलाचिंब होतो आणि श्वासात श्वास मिसळून जातो. कन्याकुमारीच्या प्रशांत परिसरात, कृष्णामाईच्या सानिध्यात, गंगायमुनेच्या सहवासात, हिमालयाच्या कुशीत अशी माझी भावसमाधी लागते.''[५५] वाणीतून अमृत पाझरणारा हा वक्ता प्रसन्न अन् भावपूर्ण भाषाशैली निर्माण करतो. प्राचीन काळातील भाषेचा वापरही त्यांच्या भाषणामध्ये केला होता.

''तयापासौनि आवघे वराड: तेहि एक मंडळ।
पर आघवीचि मिळौनि महाराष्ट्राचि बोलिजे''[५६]

भाषेची वैविध्यपूर्णता भाषणांमध्ये आढळून येते. त्यांच्या भाषणांमध्ये माहितीचे अफाट भांडार आहे. विद्धत्ता, तात्विकता, विवेकता, पावित्र्यता त्यांच्या भाषणांतून अनेक ठिकाणी पहावयास मिळते. खरा सुसंस्कृत मनाचा माणूस श्रोत्यांना समजेल, उमजेल, पटेल आणि मोहवेल अशा मांगल्यमय भाषेत वक्तृत्व करीत असत. सांगलीच्या श्री कडलास्कर यांना यशवंतरावांच्या हस्ते गांधी टोपी घालण्याची इच्छा असते तेव्हा

यशवंतराव सहज म्हणतात - ''मी कधीच कुणाला टोपी घातली नाही.''[५७] यातून त्यांचे कोपरखळी देण्याचे कसब प्रासंगिक संभाषणातील चातुर्य दिसून येते.संयमीपणा, वैचारिक समतोलपणा हा यशवंतरावांच्या भाषणांचा महत्त्वपूर्ण गुणविशेष दिसून येतो. एकूणच यशवंतरावांची भाषाशैली विविधांगी अविष्कारांनी नटलेली आहे. प्रभावी भाषणाचे रहस्य त्यांच्या भाषाशैलीमध्ये असल्याचे प्रत्ययास येते.

यशवंतरावांच्या भाषणांतून सामाजिक तळमळ, उपेक्षितांबद्दल सहानुभूती, दैन्य-दारिद्र्याबद्दल आत्यंतिक वेदना, शेतकऱ्यांबद्दल आत्मियता अशा संवेदनक्षम शलीचा वापर यांचे जागोजागी दर्शन घडते. श्रोत्यांच्या वयोगटानुसार भाषाशैलीचा जाणीवपूर्वक ते वापर करत. अथांग वाचनामुळे वैचारिकतेची प्रगल्भता त्यांच्या भाषणांना लाभलेली आहे. रसिकांना आत्मपरिक्षण करण्यास भाग पाडणारी त्यांची शैली प्रेरणा देणारी ठरते. कोणताही विषय असो त्यावर शास्त्रशुध्द विवेचन ते करतात. प्रतिपक्षावर हल्ला करतानाही कधी कठोर तर कधी उपहासात्मक ते बोलत. बऱ्याचदा 'शालजोडीतील आहेर' करीत असत. पण लाखो जनसमुदायाला आपल्या वक्तृत्वाने मंत्रमुग्ध करणारे यशवंतराव श्रोत्यांच्या हृदयसिंहासनावर आरामात आरूढ झालेले होते हे मात्र निश्चित होय.

## समारोप :-

अशा प्रकारे यशवंतरावांच्या भाषणांमधील वाङ्मयीन सौंदर्य रसिक मनाला मोहवून टाकणारे, साहित्यिक मूल्यांची जोपासना करणारे, विवेकशील विचारांतून प्रासादिकता निर्माण करणारे आहे.

यशवंतरावांच्यावर अफाट प्रेम करणारे, त्यांच्यासाठी वाहून घेतलेले यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कराडचे सचिव श्री विठ्ठलराव पाटील यशवंतरावांच्या वक्तृत्वाबद्दल म्हणतात - ''यशवंतराव चव्हाण उत्कृष्ट रसिकराज होते, तसे रसाळ वक्तेही होते. त्यांचे वाचन अफाट, चौफेर होते. त्याचा त्यांना वक्तृत्वाच्या आकर्षक मांडणीसाठी खूप उपयोग होत असे. आपल्या भाषणात सुभाषितवजा सुंदर वाक्यांची पखरण करण्यात त्यांचा हातखंडा होता.''[५८] तर डॉ. चंद्रकांत देऊळगांवकर यशवंतरावांच्या भाषणाच्या वाङ्मयीन सौंदर्याबाबत म्हणतात - ''यशवंतरावांचे प्रत्येक भाषण चिंतन व मनन करण्यासारखे आहे. प्रत्येक भाषणात संयम आहे, प्रगल्भता आहे, विवेक आहे, चिंतनशीलता आहे, सहजता आहे, प्रसादगुण आहे.''[५९] आजच्या पिढीस प्रेरक ठरणारी

भाषणे ठरतात. डॉ. हे. वि. इनामदार त्यांच्या भाषणातील शेलीबाबत म्हणतात - "राष्ट्रवादी विचारसारणी, असाधारण समाजमनस्कता, रससंपन्न भाषाशैली आणि निकोप जीवनदृष्टी यांचा प्रत्यय त्यांच्या समग्र ग्रंथसंपदेतून येतो. लेखणी आणि वाणी या दोन्ही माध्यमातून त्यांनी आयुष्यभर लोकशिक्षण आणि समाजप्रबोधन केले."[६०]

एकूणच यशवंतरावांचा शब्द सामर्थ्यावर प्रचंड विश्वास होता. सौंदर्यावर व भाषेवर अतोनात प्रेम होते. यशवंतराव स्वतःच या संदर्भात म्हणतात - "मी शब्दांना फार मानतो.त्यांच्यात अस्त्राचे सामर्थ्य आहे तसेच प्रकाशाचे तेज आहे. एखादा शब्द कोणी अशावेळी उच्चारतो की त्यामध्ये एक विलक्षण सामर्थ्य येते". यशवंतरावांना शब्दसामर्थ्याची चांगलीच जाण असल्यामुळे आपल्या भाषणांतून ते जाणीवपूर्वक शब्दयोजना करतात.

प्रसिध्द लेखक, समीक्षक ना.सी. फडके यशवंतरावांच्या भाषणांबाबत म्हणतात - "भावनेनं ओथंबलेलं, प्रभावी भाषेनं नटलेलं लेखन जी लेखणी करू शकते, ती साधीसुधी लेखणी नाही. श्रेष्ठ दर्जाच्या अस्सल साहित्यिकाच्या हातात शोभावी, अशीच ती आहे."[६१] तर जेष्ठ समीक्षक डॉ. भगवान कवठेकर म्हणतात - "ज्ञानेश्वरांच्या ओवीत यशवंतराव जीवनाची भव्यता, विशालता आणि दिव्यता बघत असत, तर तुकारामांच्या अभंगात जीवनाचे रूप, स्वरूप आणि आशय ते बघत.शाहिराच्या पोवाड्यात मराठीच्या व मराठ्यांचा पराक्रम त्यांना नतमस्तक व्हायला लावीत असे.पंडिताच्या विद्वत्तेविषयी ते विनम्र होऊन आपल्या आदरयुक्त शब्दरूपाने, वक्तृत्वाने व्यक्त करीत असत. वेरूळ अजिंठ्याच्या लेण्यातून दर्शित होणारे कलाविश्व त्यांना अभिमानास्पद वाटत असे तर मराठी लावणीतील मुग्ध शृंगाराला जीवनातील शिवत्वाचा पवित्र स्पर्श झाला असल्याचे त्यांना जाणवत असे."[६२]

थोडक्यात यशवंतरावांच्या भाषणांना वाङ्मयीन सौंदर्याचा एक वेगळाच डौल प्राप्त झालेला होता. मोजक्याच शब्दात संपूर्ण ब्रह्मांड उभे करण्याची ताकद त्यांच्या भाषाशैलीत होती. यशवंतरावांच्या विचार, वाणी आणि अभिव्यक्ती या त्रिवेणी संगमातून त्यांचे वक्तृत्व रसिक मनाला मोहिनी घालत असे. त्यांची भाषाशैली ही नेहमीच नाविन्यपूर्ण असे. त्यांच्या भाषणाला कलावंताची तरल संवेदनक्षमता, सर्जनशील नवोन्मेषशाली प्रतिभा अन् शब्दशक्तीची संपन्नता लाभलेली असे. अशी त्यांची भाषणे मराठी वाङ्मयामध्ये मोलाची भर टाकणारी ठरतात असे मला वाटते.

संदर्भ टीपा -

१. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. १२८.

२. उ.नि. पृ.क्र. ३१४.

३. 'यशवंत विचार अमृत' - सी.डी. पवार, प्रमोद प्रकाशन, नेर्ले, मे २००२, पृ.क्र. ७७.

४. 'यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व' - विठ्ठलराव वि. पाटील, कऱ्हाड, प्रकाशक -दिपक वि.पाटील, द्वितीय आवृत्ती, ऑक्टोबर २००२, पृ.क्र. ५३.

५. उ.नि. पृ.क्र. ०९

६. 'यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य' - भा.ल. भोळे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८५, पृ.क्र. १५.

७. 'जनामनातील यशवंतराव' - डॉ. नागनाथ हेगे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, फेब्रु. २००२, पृ.क्र. ६२.

८. 'युगान्तर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मे १९७०, पृ.क्र. २०८.

९. 'यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य' - भा.ल. भोळे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८५, पृ.क्र. १६.

१०. 'यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व' - विठ्ठलराव वि. पाटील, कऱ्हाड, प्रकाशक -दिपक वि.पाटील, द्वितीय आवृत्ती, ऑक्टोबर २००२, पृ.क्र.१७३.

११. उ.नि. पृ.क्र. १३.

१२. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र.

१३. 'जनामनातील यशवंतराव' - डॉ. नागनाथ हेगे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, फेब्रु. २००२, पृ.क्र. ६६.

१४. 'यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व' - विठ्ठलराव वि. पाटील, कऱ्हाड, प्रकाशक -दिपक वि.पाटील, द्वितीय आवृत्ती, ऑक्टोबर २००२, पृ.क्र.१६९.

१५. उ.नि. पृ.क्र. ११८.

१६. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. २९३.

१७. उ.नि. पृ.क्र. २१८.

१८. 'युगान्तर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मे १९७०, पृ.क्र.१८४.

१९. 'भूमिका' - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टिज पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, डिसेंबर १९७९, पृ.क्र. ९३.

२०. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. २९३.

२१. 'यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व' - विठ्ठलराव वि. पाटील, कऱ्हाड, प्रकाशक -दिपक वि.पाटील, द्वितीय आवृत्ती, ऑक्टोबर २००२, पृ.क्र.१२०.

२२. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. २९९.

२३. उ.नि. पृ.क्र. १४२.

२४. 'यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व' - विठ्ठलराव वि. पाटील, कऱ्हाड, प्रकाशक -दिपक वि.पाटील, द्वितीय आवृत्ती, ऑक्टोबर २००२, पृ.क्र.१५५.

२५. 'यशवंतराव चव्हाण : शब्दाचे सामर्थ्य' -संपादक : राम प्रधान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, २०००, पृ.क्र. ३२८.

२६. 'युगान्तर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मे १९७०, पृ.क्र.१४९.

२७. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. २९३.

२८. 'महाराष्ट्राचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण' - वि.वि. पाटील, महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर २००२,पृ.क्र.३२.

२९. 'ऋणानुबंध' - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, एप्रिल १९८६, पृ.क्र. १२२.

३०. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. ३१४.

३१. 'यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य' - भा.ल. भोळे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८५, पृ.क्र. १४३.

३२. 'बांधिलकी आणि साहित्य' - यशवंत मनोहर, सिल्विह्या प्रकाशन, नागपूर,

प्रथमावृत्ती १९८३, पृ.क्र. १७.

३३. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. २७.

३४. 'यशवंत विचार अमृत' - सी.डी. पवार, प्रमोद प्रकाशन, नेर्ले, मे २००२, पृ.क्र. ५१-५२.

३५. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. २९४.

३६. 'जनामनातील यशवंतराव' - डॉ. नागनाथ हेगे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, फेब्रु. २००२, पृ.क्र. ७.

३७. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. २५२.

३८. 'भूमिका' - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, डिसेंबर १९७९, पृ.क्र. १६३.

३९. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. ८५-८६.

४०. उ.नि. पृ.क्र. १०३.

४१. उ.नि. पृ.क्र. २९१.

४२. उ.नि. पृ. क्र. १९३

४३. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मे १९७०, पृ.क्र. १७४.

४४. 'यशवंतराव चव्हाण : विधी मंडळातील निवडक भाषणे' - १९४६-६२, संपादक डॉ. व्ही. जी. खोब्रेकर, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, प्रथम आवृत्ती, नोव्हें. १९८९, पृ.क्र. २१

४५. 'यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व' - विठ्ठलराव वि. पाटील, कऱ्हाड, प्रकाशक -दिपक वि.पाटील, द्वितीय आवृत्ती, ऑक्टोबर २००२, पृ.क्र.१०९.

४६. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. ८५-८६.

४७. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मे १९७०, पृ.क्र. १७०.

४८. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मे १९७०, पृ.क्र. ०३.

४९. उ.नि. पृ.क्र. १०

५०. उ.नि. पृ.क्र. १०२.

५१. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. ४२.

५२. 'भूमिका' - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, डिसेंबर १९७९, पृ.क्र. ९५.

५३. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मे १९७०, पृ.क्र. १३१.

५४. उ.नि. पृ.क्र. १६१.

५५. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, तृतीय आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. १९७.

५६. उ.नि. पृ.क्र. ३९.

५७. 'यशवंतराव चव्हाण' - डॉ. गंगाधर वि. कायदे पाटील, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, प्रथमावृत्ती, डिसेंबर २०००, पृ.क्र. २१८.

५८. 'यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व' - विठ्ठलराव वि. पाटील, कऱ्हाड, प्रकाशक -दिपक वि.पाटील, द्वितीय आवृत्ती, ऑक्टोबर २००२, पृ.क्र.१०१.

५९. 'जनामनातील यशवंतराव' - डॉ. नागनाथ हेगे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, फेब्रु. २००२, पृ.क्र. १३९.

६०. उ.नि. पृ.क्र. ६४.

६१. 'यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य - भा.ल. भोळे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८५, पृ.क्र. १५२.

६२. 'यशवंतराव चव्हाण' - डॉ. गंगाधर वि. कायदे पाटील, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, प्रथमावृत्ती, डिसेंबर २०००, पृ.क्र. २१६.

***